| MHLA140007182026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ४९/२०२६** |
| --- | --- |
| | **( मुनाफ विरूद्ध महाराष्ट्र सरकार )** |

## मधील नि.०१ खालील आदेश

अर्जदार मुनाफ उस्मानसाब कुरेशी यांनी सदरचा अर्ज भादा पोलीस ठाणे यांचे कडे गु.र.क्र. ३०/२०२६ मध्ये जप्त मुद्देमाल परत मिळणेकामी दाखल केला आहे.

(२) अर्जदाराने ३ बैल भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे परत मिळणेकामी अर्ज दाखल केला असून अर्जासोबत शपथपत्र, प्रथम खबरी अहवाल, आधार कार्ड व ३ बैलाचे ग्रामपंचायत करजखेडा यांचे दाखले दाखल केले आहेत.

(३) सदर अर्जावरती सरकारी वकील श्रीमती रेचवाडे तपासिक अधिकारी व संत बापुजी पाटील गोशाळा, रिंगणी ता. औसा जि. लातूर यांचे म्हणणे मागविण्यात आले. तपासिक अधिकारी यांनी नि. ५ वरती व संत बापुजी पाटील गोशाळा यांनी नि. ८ वरती आपले म्हणणे दाखल केले आहे.

(४) अर्जदाराचे वतीने विधिज्ञ श्रीमती भुजबळ यांनी थोडक्यात असे कथन केले की, अर्जदार हा शेतकरी असुन जप्त मुद्देमाल ३ बैलांचे मालक आहेत. त्यांला शेतीच्या कामासाठी जनावराची आवश्यकता आहे. पोलीसांनी जप्त केलेले ३ बैल आजारी पडण्याची शक्यता आहे. भादा पोलीसांनी ३ पांढरे बैल गु.र.क्र ३०/२०२६ मध्ये जप्त केले असून अर्जदार हा खाटीक गल्ली, औसा ता. औसा जि. लातूर येथील कायमचा रहिवासी व शेतकरी आहे. त्याला शेतीकामासाठी ३ बैलाची आवश्यकता असलेने ते परत देणेत यावे अशी मागणी केली.

(५) तपासीक अधिकारी व सरकारी वकील यांनी आपले म्हणणे सादर करून असा युक्तिवाद केला की, सदरचा गुन्हा पशु संरक्षण अधिनियम कलमाखाली दाखल झालेला आहे. सदर गुन्ह्यात विना परवाना ३ बैल गोवंश जातीचे कोठुन व कोणाकडून आणले, याबाबत चौकशी करणे बाकी आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या ग्रामपंचायतीच्या पावत्या या मालकीचा पुरावा ठरु शकत नाहीत. तसेच अर्जदाराने शेतकरी असल्याबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. ती गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी घेऊन जात असलेबाबत तपास करणे बाकी आहे. अर्जदारास ३ बैल परत दिल्यास त्यांची अवैधरित्या कत्तल होऊ शकते त्यामुळे अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

(६) संत बापुजी पाटील गोशाळा, रिंगणी ता. औसा यांनी आपले म्हणणे दाखल करून युक्तिवाद केला की, सदरचा मुद्देमाल गोवंशीय बैल असून त्यांना क्रुरतेने बेकायदेशीर वाहतुक करून कत्तलीसाठी नेणेत येत असताना पोलीसांनी ते जप्त केले आहेत. ते गोशाळेत सुरक्षित असून अर्जदाराचा अर्ज नामंजुर करून त्यांचा ताबा गोशाळेलाच देण्यात यावा. अर्जदाराकडून प्रति बैल प्रतिदिवस रूपये २००/– खर्च गोशाळेस देणेत यावा अशी विनंती केली. युक्तिवादाचे समर्थनार्थ त्यांनी काही कागदपत्रे, शासन निर्णय दाखल केले आहेत.

(७) उपरोक्त अर्ज, म्हणणे व कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अर्जदाराने प्रथम खबरी अहवाल दाखल केला असून फिर्याद अतिष गोपीनाथ चव्हाण हॉटेल चालक यांनी दि.०१.०३.२०२६ रोजी फिर्याद दाखल केली की, दि. ०१.०३.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता ते तुळजापुर येथुन लातुर येथे येत असताना बेलकुंड गावचे पुढे दोन कि.मी. आले असता एक महिंद्रा पिक अप क्र. एम.एच. २४ – ए.यु– १७३२ मध्ये अवैध गोवंशी ची वाहतुक होत आहे असा ११२ वर कॉल आला आणि त्यांना सांगितले की, सदर वाहणांमध्ये ३ बैल दाटीवाटीने एकमेकांच्या पायांवर पाय गुंतलेल्या स्थितीत भरुन जात असल्याने त्यांनी सदर वाहन चालकाचे नाव गाव विचारले असता त्याचे त्याचे नव मोहसीन कुरेशी रा. औसा असे सांगितले त्यानंत हे बैल कोणाकडे घेवुन जात आहेत असे

विचारले असता मुन्ना कुरेशीकडे घेवुन जात आहे असे त्याने सांगितले. त्यानंतर सदर वाहनाच्या पाठीमागील फळया काढुन अधिक पाहणी केली असता त्यामध्ये गोवंश जातीचे तीन बैल सदर वाहनात दाटीवाटीने एकमेकांच्या पायावर पाय गुंतलेल्या स्थितीत भरलेले मिळुन आले.

(०८) अर्जाचे अवलोकन केले असता, अर्जदाराने ३ गोवंशीय बैल पिकअप गाडी क्र. MH 24-AU -1732 मधून दाटीवाटीने एकमेकांचे पायात पाय बांधून घेवून जात असताना मिळुन आला आहे. अर्जदार हे शेतकरी असून त्यांनी ३ बैलांना क्रुरतेची वागणूक देवून दाटीवाटीने एकाच गाडीतून घेवून जाताना आरोपी मिळुन आले आहेत. सदर गुन्हयाचा तपास चालू असून पोलीसांनी जप्त मुद्देमाल सुरक्षित ठिकाणी म्हणजेच गोशाळेत जमा केला आहे. गोशाळे तर्फे युक्तिवादात त्यांची योग्य ती निगा व काळजी तेथे घेतली जात असल्याचे कथन केले आहे. तसेच अर्जदार हे खाटीक असुन ते बैलांना उपाशी अथवा क्रूर वागणूक देवून घेवून जात होते की नाही हा पुराव्याचा भाग आहे. अर्जदारास जप्त मुद्देमाल ३ बैल परत दिले असता ज्या कायद्यानुसार त्यांचेवरती गुन्हा दाखल केला होता त्या कायद्याचा उद्देश असफल होवू शकतो. अर्जदाराने दाखल केलेले ग्रामपंचायत कार्यालय, करजखेडा च्या जनावर खरेदी विक्रीचे दाखले पाहता दि. ०१.०३.२०२६ रोजीचे सर्व दाखले असून एकाच दिवशी ३ बैल खरेदी केले होते याबाबत संशय निर्माण होतो. तसेच त्या दाखल्यावरती विक्रेत्याचा सही असून खरेदी घेणार म्हणून अर्जदाराची कोठेही सही/अंगठा नाही.

(०९) अर्जदाराने बैलांची खरेदी करताना त्यांची वैद्यकीय तपासणी करुन त्याचे प्रमाणपत्र अर्जात दाखल केलेले नाही. तसेच त्यांच्या अन्न पाण्याची व्यवस्था व एम.एच. २४– ए.यु. १७३२ ही महिंद्रा पिक अप असुन त्यामध्ये तीन बैल त्यांची काळजी घेवुन वाहतुक करत होते याबाबत देखील कोठेही कथन केले नसल्याने बैलांची काळजी घेवुन वाहतुक करण्यात आली होती याबाबत संशय निर्माण होतो. अर्जदाराने महिंद्रा पिक गाडीतुन बैलांची वाहतुक करण्याकरीता त्यांच्याकडे वाहतुक परवाना असल्याबाबत कथन केलेले नाही अथवा वाहतुक

परवाना अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच अर्जदाराने दाखल केलेला कृषी उत्पन्न बाजार समिती औसा यांचा परवाना क्र. जे.बी. २४ वर्ष २०२१ ते २०२२ दाखल केला असुन तो परवाना पाहिला असता अर्जदार यांना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रात अडत्या, व्यापार, दलालाचा धंदा करण्यासाठी परवाना देण्यात आलेला होता. सदर परवान्यात कोठेही बैलाचा खरेदी विक्री करण्यासाठी परवाना दिल्याचे दिसुन येत नाही. तसेच दि. २७.०२.२०२४ रोजीचा महाराष्ट्र शासन निर्णय पाहता असे दिसून येते की, राज्यातील सर्व पशुधनाची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी म्हणून सर्व पशुंचे ईअर टॅगिंग करून नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर करणे बंधनकारक आहे. दि. ३१.०३.२०२४ पर्यंत राज्यातील सर्व पशुधनांची ईअर टॅगिंग करणे बंधनकारक आहे. तसेच दि. ०१.०६.२०२४ नंतर ईअर टॅगिंगशिवाय पशुची खरेदी–विक्री करणे बेकायदेशीर आहे. अर्जदाराने कोठेही जप्त मुद्देमालाचे ईअर टॅगिंग केले आहे व नोंद केली आहे असे कथन केले नाही. याउलट अर्जदाराने खरेदी विक्री करण्यासंदर्भात परवाना असल्याचे कथन करुन चुकीचा परवाना सन २०२१ ते २०२२ या कालावधीतील दाखल केला असुन ३ बैलांची बेकायदेशिर वाहतुक केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन आल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा अर्ज नामंजुर करणेत येत आहे.

२. अर्जात नमूद जप्त मुद्देमाल ३ गोवंशीय बैल हे संत बापुजी पाटील गोशाळा, रिंगणी ता. औसा यांचे गोशाळेत जमा असून पुढील आदेशापर्यंत त्यांना तेथेच ठेवण्यात यावे.

३. गोशाळेत शासकीय अनुदान प्राप्त होत असलेने तसेच गोसंरक्षण करणेकरिता संस्था निर्माण झाली असलेने त्यांचा सांभाळ करणे त्यांची जबाबदारी असुन सदर गोशाळेने ३ बैलाची काळजी व संभाळ व्यवस्थीत करत असल्याबाबत दर १५ दिवसातुन बैलाची संबंधीत वैद्यकीय अधिकारी

यांच्याकडुन तपासणी करुन त्याचा अहवाल न्यायालयात सादर करावा.

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2026.04.08 18:06:24 +0530

ठिकाणः औसा. (श्रीमती एस. डी. साबळे)
दिनांकः ०८/०४/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, औसा.
(न्यायालय क्र.२).

***